**भोसरी पोलीस स्टेशन पिंपरी चिंचवड आयुक्तालय**
**पत्ताः- पुणे नाशिक हायवे, सी. आय. आर. टी. जवळ, एमआयडीसी भोसरी, पुणे.२६ फोन नं. ०२०- २७१२४७२८**
**ई--मेल आयडी** psbhosari.pcpc-mh@gov.in

**प्रेसनोट दिनांक ३०/०५/२०२३**

# † प्रवाशांना लुटणाऱ्या टोळीचा पर्दाफाश लुटारूंना भोसरी पोलीसांकडुन अटक †

भोसरी पोलीस स्टेशन हद्दीत एका इसमास रात्रीच्या वेळी प्रवासी म्हणुन ॲटो रिक्षामध्ये बसुन तीन इसमांनी त्यास भोसरी एमआयडीसी मध्ये घेवुन जावुन त्यास चाकुचा धाक दाखवुन त्याचेकडील मोबाईल फोन, रोख रक्कम व सॅगबॅग घेवुन त्यास मारहाण करून अंधारात सोडुन दिल्याने सदर प्रवासी इसमाच्या तक्रारीवरून भोसरी पोलीस स्टेशन गु.र.नं.४२२/२०२३ भादवि कलम ३९४,३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता. फिर्यादी यांनी सदर ॲटो रिक्षाचा नंबर अर्धवट पाहिला होता त्या नंबरच्या ॲटो रिक्षाची आरटीओ कडुन माहिती घेवुन तसेच गुन्ह्यात दिसणाऱ्या ॲटो रिक्षा सारख्या दिसणाऱ्या सुमारे ३०० ते ४०० ॲटो रिक्षा तपासुन ॲटो रिक्षाचालकांकडे तपास केला त्याचप्रमाणे सुमारे १३० ते १५० सीसीटीव्ही कॅमेरे चेक केले पण काही एक उपयुक्त माहिती मिळत नव्हती. तपासा दरम्यान चोरीस गेलेल्या मोबाईल फोनच्या केलेल्या तांत्रीक तपासात आरोपी नामे दिलीप गायकवाड याचे नाव निष्पन्न झाले परंतु तो फिरस्ता असल्याने त्याला शोधण्याचे आव्हान पोलीसांसमोर होते. सदर आरोपी वाकड येथे एका कारवर ड्रायव्हर म्हणुन सध्या काम करीत असल्याची गोपणीय बातमी मिळाली असता भोसरी तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार हे प्रवासी बनुन वाकड येथे सापळा लावुन आरोपी नामे कार चालकास दिलीप शिवराम गायकवाड रा. शिवाजी चौक, एसपी ऑफीस समागे, जनावरांचे दवाखान्यासमोर, लातूर यास ताब्यात घेतले त्यावेळी त्याचे ताब्यात चोरीस गेला मोबाईल फोन व इतर दोन मोबाईल फोन मिळुन आले. त्याने दाखल गुन्हा त्याचे साथीदारांच्या मदतीने केल्याचे निष्पन्न झाल्याने त्याला अटक केली. त्याचा साथीदार संदीप साहेबराव पवार, रा. स्वामी विवेकानंद शाळेसमोर, मु. साई, पो. महापुर, ता.जि लातुर हा त्यांनी दाखल गुन्ह्यात वापरलेल्या ॲटोरिक्षासह महाळुंगे, ता. खेड, जि पुणे येथे आल्याची बातमी मिळाल्याने त्याला ताब्यात घेवुन त्याला अटक केली. अटक करण्यात आलेले दोन्ही आरोपी सराईत गुन्हेगार असुन त्यांचेवर लातूर, परभणी, नांदेड जिल्ह्यात अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत. त्यांचेकडे चोरीचे मोबाईल फोन मिळून आले असून भोसरी पोलीस ठाणेकडील ३ गुन्हे उघडकीस आले आहेत. भोसरी पोलीस अधिक तपास करीत आहोत.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री. विनय कुमार चौबे, मा. पोलीस सह. आयुक्त श्री. डॉ. संजय शिंदे, मा. अप्पर पोलीस आयुक्त श्री वसंत परदेशी, मा. पोलीस उपायुक्त परिमंडळ – १ श्री. विवेक पाटील, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, पिंपरी विभाग श्री. विशाल हिरे सो., वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. भास्कर जाधव, यांच्या प्रत्यक्ष मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरिक्षक, कल्याण घाडगे, पोलीस उप-निरीक्षक मुकेश मोहारे, तसेच सहा. पोलीस फौजदार राकेश बोयणे, पोलीस अंमलदार सचिन गारडे, नवनाथ पोटे, धोंडीराम केंद्रे, सागर जाधव, तुषार वराडे, आशिष गोपी, प्रतिभा मुळे, संतोष महाडीक, स्वामी नरवडे, भाग्यश्री जमदाडे, सुषमा पाटील यांनी सदरची उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

**(विवेक पाटील )**
**पोलीस उप-आयुक्त**
**परिमंडळ -१, पिंपरी चिंचवड.**